N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** सोलापुर ग्रामीण **P.S.(ठाणे):** टेंभुर्णी **Year (वर्ष):** 2022

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0357 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 02/06/2022 23:17 बजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** गुरूवार

**Time Period (कालावधी):**

**Date From (दिनांक पासून):** 02/06/2022
**Date To ( दिनांक पर्यंत):** 02/06/2022
**Time From (वेळेपासून):** 11:53 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 14:05 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 02/06/2022 **Time (वेळ):** 23:00 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**

**Entry No. (नोंद क्र.):** 029 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 02/06/2022 23:05 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** पूर्व, 30 किमी

**Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** मौजे मोडनिंब तलाठी कार्यालयात, मोडनिंब ,माढा

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** अशोक जगन्नाथ भांगे

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1982 (d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):** **Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

(h) **Address (पत्ता):**

| S.No.(अ. क्र.) | Address Type (पत्त्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | मोडनिंब, तामाढा, जि सोलापूर, ता माढा,टेंभुर्णी ,सोलापुर ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | मोडनिंब, तामाढा, जि सोलापूर, ता माढा,टेंभुर्णी ,सोलापुर ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.):**

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | महेशकुमार मनोहर राऊत राऊत | | | 1. मिडशिंगी ,ता सागोला ,टेंभुर्णी ,सोलापुर ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

11 **Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ. क्र.) | UIDB Number (यु.आय.डी. बी.क्र.) |
|---|---|

12 **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्यादी जबाब दिनांक 02.06.2022मी श्री. अशोक जगन्नाथ भांगे, वय-40 वर्षे, व्यवसाय-शेती, रा. मोडनिंब, ता. माढा, जि. सोलापूर समक्ष फिर्यादी जबाब देतो की, मी वरील ठिकाणी माझे कुटुंबासह राहण्यास आहे. माझी मौजे मोडनिंब येथे गट क्र.522 वर 58 आर बागायत शेत जमीन आहे. सदर 58 आर शेतजमीनी पैकी 40 आर क्षेत्रफळावर महोगनी या झाडाची लागवड केलेली आहे. सदर गट क्र.522 च्या सातबारा उताऱ्यावर महोगनी झाडाची 40 आर क्षेत्रफळावर लागवड केलेबाबत पिकपाण्याची नोंद लावणी कामे मौजे मोडनिंब येथील गावकामगार तलाठी श्री. महेशकुमार राऊत यांना दि.30.05.2022 रोजी भेटलो होतो. त्यावेळेस तलाठी राऊत यांनी माझ्या सातबारा उताऱ्यावर पिकपाण्याची नोंद घेणेकामी माझ्याकडे 4000/- रुपयांची मागणी केली होती. व दि. 01.06.2022 रोजी तलाठी राऊत यांनी 4000/- रुपये घेवून बोलावले होते.तलाठी राऊत हे माझ्याकडे मागणी करत असलेली रक्कम ही कोणतीही शासकिय फि नसून ती लाच रक्कम असलाची मला खात्री झाली. मला तलाठी राऊत यांना कोणतीही लाच देण्याची इच्छा नसल्याने, माझ्याकडे लाचेची मागणी करणारे तलाठी राऊत यांचेवर योग्य ती कायदेशीर कारवाई करावी म्हणून मी ॲन्टी करप्शन ब्युरो सोलापूर कार्यालयास दि.01.06.2022 रोजी समक्ष येवून थोडक्यात माझी तक्रार सांगितली. तेथील अधिकारी पोलीस निरीक्षक श्री. कोळी यांनी माझी तक्रार ऐकुन सदर दिवशी तक्रारीच्या अनुषंगाने सापळा कारवाई करण्याचे ठरविले. त्यानंतर मी माझ्या मोटार सायकलवरुन निघालो व पोनि कोळी व सापळा पथक, दोन्ही पंचासह शासकीय वाहनाने रंगभवन, मोहोळ मार्गे मोडनिंब गावाचे अलिकडे मोहोळकडे जाणाऱ्या रोडच्या बाजूला 12.00 वा. आम्ही येवून थांबलो. त्यांनतर पोनि कोळी यांनी मला वाहनामध्ये बोलावून घेवून तेथे उपलब्ध असलेल्या तालुका कृषी अधिकारी कार्यालय, दक्षिण सोलापूर या कार्यालयातील शासकीय पंच श्री. शंकर चव्हाण व श्री. प्रभाकर जाधव यांची ओळख करून दिली. त्यानंतर पोनि कोळी यांचे सुचनेवरून दोन्ही पंचानी मला माझे नाव गाव विचारले असता, मी माझे नाव गाव त्यांना सांगितले. त्यानंतर पोनि कोळी यांचे सुचनेवरून दोन्ही पंचानी मला माझी तक्रार विचारली असता, मी तलाठी राऊत यांचे विरूध्दची वरीलप्रमाणे तक्रार सांगितली. त्यानंतर पोनि कोळी यांचे सांगणेवरुन पंचासमक्ष मी माझी तक्रार लिहुन दिली. सदरची लेखी तक्रार पोनि कोळी व दोन्ही पंचानी वाचून त्यावर सह्या केल्या. त्यानंतर पोनि कोळी यांनी मी दिलेल्या तक्रारीची पडताळणी करण्याचे ठरवले. त्यासाठी आम्हास व्हईस रेकर्डर दाखवून त्याविषयी माहिती दिली व त्यामध्ये नवीन 8 जी.बी. चे मेमरी कार्ड टाकण्यात आले. त्यानंतर पोनि कोळी यांनी मी व माझ्या सोबत पंच नं 1 चव्हाण यांना आम्ही मोडनिंब गावातील तलाठी कार्यालयात जावून तेथे तलाठी राऊत यांची भेट घेवून त्यांच्याशी माझे कामाबाबत चर्चा करावी. त्यावेळी त्यांनी लाचेची मागणी केल्यास थोड्यावेळात आणून देत असल्याबाबत सांगावे, अश्या सविस्तर सुचना मला व पंच नं.1 चव्हाण यांना दिल्या. त्यानंतर माझ्या गळयात व्हईस रेकर्डर शर्टचे आतील बाजूस चालु करुन आडकावून पंच क्र.1 चव्हाण यांचेसोबत माझे मोटार सायकल क्र. एम.एच.45, झेड 4014 वरून मोडनिंब तलाठी कार्यालयाकडे पाठवले. त्यावरून मी, पंच नं 1 चव्हाण यांच्यासह तलाठी राऊत यांची मोडनिंब गावातील तलाठी कार्यालयात भेट घेण्यास गेलो

असता, सदर ठिकाणी तलाठी राऊत हे कार्यालयात हजर नसल्याने मी त्यांना त्यांचा मोबाईल क्र.8329623224 वर कल केला असता, तलाठी राऊत यांनी मिटींगसाठी माढा येथे असल्याने आजरोजी कार्यालयास येणार नसल्याचे सागुन मी उदया कार्यालयास आल्यावर भेटू असे सांगुन फोन बंद केला. त्यामुळे मी व पंच क्र.1 चव्हाण असे सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी मोटार सायकलवरुन परत आलो.त्यावेळेस पोनि कोळी यांनी माझ्या गळयातील व्हाईस रेकर्डर काढून बंद करुन तो त्यांच्या ताब्यात घेतला. त्यानंतर पोनि कोळी यांनी मला तलाठी राऊत यांची भेट घेण्यासाठी गेल्यानंतर काय घडले याची हकीकत विचारली असता वरील प्रमाणे हकीकत सांगितली. त्यावरुन पोनि कोळी यांनी सदरची सापळा कारवाई तात्पुरती स्थगित करण्याचे सर्वानुमते ठरवुन मला दिनांक 02.06.2022 रोजी सकाळी 11.00 वा. चे सुमारास मोहोळकडे जाणाऱ्या रोडवर मोडनिंब गावापासुन दोन किलोमीटर अंतरावर आलीकडे रस्त्याच्या बाजूस येवुन थांबण्यास सांगितले. तसेच गोपनियतेबाबत योग्य त्या सुचना दिल्या. त्याचप्रमाणे पोलीस निरीक्षक श्री चंद्रकांत कोळी यांनी दोन्ही पंचाना गोपनियतेच्या योग्य त्या सुचना देवुन पंचाना दिनांक 02.06.2022 रोजी सकाळी 10.00 वा. ऍन्टी करप्शन ब्युरो, सोलापूर कार्यालयात हजर राहण्याच्या सुचना दिल्या.त्याप्रमाणे मी दिनांक 02.06.2022 रोजी सकाळी 11.00 वा. मोडनिंब गावचे अंदाजे 2 किमी आलिकडे रस्ताच्या बाजूस येवून थांबलो. त्यावेळेस पोलीस निरीक्षक चंद्रकांत कोळी हे त्यांचे स्टाफसह तेथे शासकीय वाहनाने आले. त्यानंतर पोनि कोळी यांनी मी दिलेल्या तक्रारीची पुन्हा पडताळणी करावयाचे ठरवुन काल दिलेल्या सुचनप्रमाणे कारवाई करावयाचे ठरले. त्यानंतर माझ्या गळयात व्हईस रेकर्डर शर्टाचे आतील बाजूस चालु करुन आडकावून पंच क्र.1 चव्हाण यांचेसोबत माझे मोटार सायकलवरुन मोडनिंब तलाठी कार्यालयाकडे पाठवले. त्यावरून मी, पंच नं 1 चव्हाण यांच्यासह तलाठी राऊत यांची मोडनिंब गावातील तलाठी कार्यालयात भेट घेवून माझ्या पिकपाण्याची नोंद लावणेबाबत कामाची चर्चा करत असताना, तलाठी राऊत म्हणाले की, मी दुसऱ्या शेतकऱ्यांना पाच घेतलेत तुम्हीपण तेवढेच करा, त्यावर मी जास्त होत्याती.. एक कमी करा कायतरी कमी करा.. किती आणाव लागल.. असे म्हणालो. त्यावर तलाठी राऊत चार... असे म्हणाले. त्यावर मी ठिकाय असे बोललो. त्यानंतर इतर चर्चा करुन तलाठी राऊत यांनी मला दुपारी 02.00 वा. येण्यास सांगितले. त्यावरून मी व पंच नं.1 चव्हाण असे नियोजित ठिकाणी परत आलो. तेथे पोनि कोळी यांनी माझ्या गळ्यातील व्हईस रेकडर काढून पंच नं.1 चव्हाण व मला हकीकत विचारुन घेतली. त्यामध्ये आम्ही उपरोक्त प्रमाणे घडलेली हकीकत सांगितली. त्यानंतर पोनि कोळी, यांनी व पंचांनी व्हईस रेकडरमध्ये माझ्यात व तलाठी राऊत यांच्यात झालेले संभाषण ऐकले. त्यामध्ये तलाठी राऊत यांनी 4000/- रूपये लाचेची मागणी केली असल्याचे स्पष्ट झाले.त्यानंतर पोनि कोळी यांच्या सुचनेवरुन मी तलाठी राऊत यांना देण्यासाठी माझ्याकडे असलेले 4000/- रूपये हजर केले. त्यात 200/- रूपये दराच्या 05 नोटा व 500/- रूपये दराच्या 06 नोटा होत्या. मी हजर केलेल्या नोटांचे क्रमांक पोनि कोळी यांनी कोऱ्या कागदावर लिहुन घेवून त्याचेवर पोनि कोळी व दोन्ही पंचानी सदरच्या नोटांचे नंबर लिहलेल्या कागदावर सह्या केल्या. सदर नोटांना ऍ◌ॅथ्रासीन पावडर लावण्याचा, त्याचे प्रात्याक्षीक करण्याचा व सापळा कारवाईमध्ये करावयाच्या कामाच्या सुचनांचा सविस्तर सापळापूर्व पंचनाम्याची कार्यवाही शासकीय वाहन ईरटिका क्रमांक एम.एच.12 यु.सी.4108 मध्ये करण्यात आली. सदर ऍन्थ्रासिन पावड लावलेल्या नोटा माझ्या शर्टाच्या डाव्या खिशामध्ये सुरक्षितरित्या ठेवण्यात आल्यात्यानंतर यातील तलाठी राऊत यांच्यावर मोडनिंब येथील तलाठी कार्यालय येथे लाचेचा सापळा आयोजीत केला. त्यामध्ये मी व पंच नं 1 चव्हाण असे दोघेजन माझ्या मोटार सायकलवरुन व उर्वरीत सापळा पथक शासकीय ईरटिका क्रमांक एम.एच.12 यु.सी.4108 मधून मोडनिंब गावातील तलाठी कार्यालयाजवळ आलो. तेथे मी, पंच नं 1 चव्हाण यांच्यासह तलाठी राऊत यांची भेट घेतली असता तेथे तलाठी राऊत यांनी मला चार सांगितले, त्यावर मी चार हजार म्हणालो असता, तलाठी राऊत हे हं.. म्हणाले. त्यावर मी चार हजार तर चार हजार असे बोलुन थोडावेळ थांबलो, त्यावेळेस पुन्हा तलाठी राऊत यांनी मला पैशाचा मेळ झाला का असे विचारले असता, मी त्यावर पैशाचा झालाय मेळ असे म्हणून इतर चर्चा करत असताना तलाठी राऊत यांनी मला त्यांचा उजव्या हाताचा अंगठा तर्जनीवर घासून पैसे देण्याचा ईशारा केला असता, मी माझे शर्टाच्या डाव्या खिशात ऍन्थ्रासीन पावडर लावलेले चार हजार रुपये काढून तलाठी राऊत यांचेसमोर धरले असता तलाठी राऊत यांनी ती लाचेची रककम उजव्या हाताने स्विकारुन त्यांच्या टेबलच्या उजव्या बाजूस असलेल्या ड्राव्हरमध्ये ठेवली. त्यानंतर मी तलाठी कार्यालयाच्या बाहेर येवून केलेल्या नियोजीत इशाऱ्यावरून सापळा पथकातील अधिकारी व कर्मचारी यांनी सदर ठिकाणी येवून तलाठी राऊत यांना रंगेहात पकडले.त्यानंतर पोनि कोळी यांनी तलाठी कार्यालय, मोडनिंब येथे दोन्ही पंचासमक्ष तलाठी राऊत यांचे दोन्ही हातांची व ड्राव्हरची पुरेसा अंधार करून अ.वा. दिव्याच्या निळे प्रकाशात तपासणी केली असता त्यांचे उजव्या हातांच्या बोटाच्या पेऱ्यावर व ड्राव्हरच्या आतील बाजुस अ.पा.ची निळसर चकाकी दिसून आली. तसेच त्यांचेकडे मिळून आलेल्या नोटांची कागदावर नमूद केलेल्या नोटांच्या नंबरांशी पडताळणी करता ते तंतोतंत मिळून आले. तसेच सदर नोटांची देखील ऍ.वा.दिव्याचे निळ्या प्रकाशात तपासणी करता त्या नोटांवर देखील अ.पा.ची निळसर चकाकी दिसून आली. तलाठी महेशकुमार मनोहर राऊत यांच्या ताब्यातुन घेतलेल्या सदरच्या नोटा पुराव्याकामी जप्त करण्यात आलेल्या आहेत. तलाठी राऊत यांना त्यांचे पुर्ण नांव व पत्ता विचारले असता त्यांनी त्यांचे नांव महेशकुमार मनोहर राऊत, वय-34 वर्षे, पद-तलाठी, सजा-मोडनिंब, ता. माढा, जि.सोलापूर रा. मेडशिंगी, ता. सांगोला, जि.सोलापूर असे सांगितले. सदरबाबत सविस्तर पडताळणी, सापळापूर्व व यशस्वी सापळा पंचनामा हटेल सागर गार्डन, रेस्टरंट ऍण्ड लजिंग, टेंभुर्णी येथे दि. 02.06.2022 रोजी पूर्ण करण्यात आलेला आहे. तरी दि. 02.06.2022 रोजी 11.53 वा ते दिनांक 02.06.2022 रोजीचे 14.05 वा. दरम्यान तलाठी महेशकुमार मनोहर राऊत यांनी आपले लोकसेवक पदाचा दुरूपयोग करून त्यांना कायद्याने मिळावयाचे त्या खेरीज लाच म्हणून माझे सातबारा उताऱ्यावर पिकपाण्याची नोंद घेण्यासाठी 4000/- रूपये लाचेची मागणी करून, ती 4000/- रुपये लाचेची रक्कम तलाठी महेशकुमार राऊत यांनी स्विकारुन सांपत्तीक फायदा मिळवुन गुन्हेगारी स्वरूपाचे वर्तन केले आहे. म्हणुन माझी महेशकुमार मनोहर राऊत, पद-तलाठी, सजा-मोडनिंब, ता.माढा, जि.सोलापूर यांचेविरुध्द भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम अन्वये फिर्याद आहे. माझा वरील फिर्यादी जबाब हा आपले कडील असलेल्या लपटपवर टंकलिखीत करण्यात आलेला असून तो प्रींट काढल्यानंतर मी वाचून पाहिला तो माझ्या सांगण्याप्रमाणे बरोबर आहे. हा जबाब दिला स.ता.म समक्ष (चंदकांत कोळी)
पोलीस निरीक्षक ॲन्टी करप्शन ब्युरो, सोलापूर

**13.Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at**
**(केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

**(1)** **Registered the case and took up the investigation: (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):** SURESH VITTAL NIMBALKAR(I (Inspector)) / PBMAH72663 **or (किंवा)**

**(2)** **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):**
**Rank (पद):**
**No.(क्र.):** **to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

**(3)** **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**

**or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)**

**(4)** **Transferred to P.S.(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**
**District (जिल्हा):**
**on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)**

**R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)**

**.4.Signature/Thumb impression of the complainant / informant.(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):**

**.5.Date and time of dispatch to the court (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

**Signature of Officer in charge, Police Station (ठाणे प्रभारी अधिका-याची**

**Name (नाव):** SURESH VITTAL NIMBALKAR
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):** PBMAH72663

पोलीस ठाणे अमलदार
[illegible] पोलीस स्टेशन